


शिक्षणमंत्री विनोद तावडे मार्गदर्शन करताना व मंचावर उपस्थित मान्यवर

# विद्यार्थी केंद्रबिंदू असणारा विद्यापीठ कायदा आणणार : विनोद तावडे

**तभा वृत्तसेवा**
**अमरावती, १ नोव्हेंबर**

## विद्यापीठात प्रस्तावित अधिनियमावर परिसंवाद

• विद्यार्थी केंद्रबिंदू असणारा प्रस्तावित महाराष्ट्र विद्यापीठ कायदा आणू, अशी ग्वाही राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी दिली. प्रस्तावित महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१५ बाबत अमरावती विद्यापीठाच्या सभागृहात रविवारी आयोजित परिसंवादात ते बोलत होते. यावेळी मंचावर पालकमंत्री प्रवीण पोटे, आ. डॉ.सुनील देशमुख, कुलगुरु डॉ. मोहन खेडकर, शिक्षण संचालक धनराज माने, समिती सदस्य तथा मुंबई विद्यापीठ कुलगुरु डॉ.संजय देशमुख, आनंद मापुस्कर, डॉ. अपूर्वा पालकर, प्रकुलगुरु डॉ. जयकिरण तिडके उपस्थित होते.

समाजाला विद्यापीठाकडून काय हवे, या बाबतीत शिक्षण क्षेत्रातील मंडळींशी संवाद साधण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगून तावडे म्हणाले की, प्रस्तावित कायद्यानुसार विद्यार्थ्यांना निर्णय प्रक्रियेत स्थान, नेतृत्व गुणांच्या विकासासाठी विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका, विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून तात्काळ तक्रार निवारण, अधिसभेवर सर्व घटकांचे योग्य प्रतिनिधित्व, अधिसभेवर सामाजिक आरक्षण आदी महत्वाच्या बाबी या कायद्यामध्ये आहेत. हा कायदा पुढील २० वर्षांचा कालखंड डोळ्यासमोर ठेवून नवीन बदलानुसार केला आहे. या हिवाळी अधिवेशनात हा कायदा सभागृहासमोर मांडण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. कुलगुरुंना शैक्षणिक कार्यासाठी वेळ देता यावा यासाठी या कायद्यत लक्ष देण्यात आले आहे.

यावेळी तावडे यांनी या कायद्याचे संगणकीय सादरीकरण केले. त्यामध्ये विद्यापीठ कायद्याची आधारभूत तत्वे, महत्वाच्या आधिकार मंडळाच्या संरचनेसाठी आधारभूत तत्वे, अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यार्थी परिषद, अभ्यास मंडळे यांचे विस्तृत सादरीकरण त्यांनी केले. पालकमंत्री प्रवीण पोटे यांनी देखील यावेळी मार्गदर्शन केले. सादरीकरणानंतर उपस्थित शिक्षक, प्राध्यापक, विधि सदस्य, तज्ज्ञ, आदींनी आपल्या सूचना मंत्र्यांसमोर मांडल्या. त्यानंतर आणखीही सूचना तथा कायद्यातील बाबीं विषयी िंुरवशीराळींळसारळश्र.लो या ई-मेल वर संपर्क साधण्याचे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाला शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. विद्यापीठ मानव संसाधन विकास केंद्र अतिथीगृहाच्या इमारतीचे उद्घाटन यावेळी विनोद तावडे यांच्या हस्ते झाले. यावेळी पालकमंत्री प्रवीण पोटे, आ. डॉ. सुनील देशमुख, कुलगुरु डॉ. मोहन खेडकर उपस्थित होते.